तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ४ जून २०२५

आतील पानावर

पान २– नव्वदीचे जादुई दशक
पान ३– अथिया शेट्टीने बॉलीवूड सोडले
पान ४– हर्षवर्धन राणेच्या 'दीवानियत'च्या ...
पान ५–'कप बशी'त पूजा सावंत झळकणार
पान ६– संजय कपूरच्या लेकीचे...

# आलियाने केली ऐश्वर्याची स्तुती



बॉलीवुड अभिनेत्री आलिया भट्टने यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये पदार्पण केले. ऑफ-शोल्डर बस्टियर गाउन आणि समारोपावेळी क्रिस्टलने नक्षीकाम केलेली साडी यामुळे तिच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधले. आलियाचे कान्समधील पदार्पण यशस्वी ठरले असून, तिचा हा लूक पुढील कान्सपर्यंत प्रेक्षकांच्या स्मरणात राहील. याचदरम्यान, आलियाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये तिने ऐश्वर्या राय यांची मनापासून स्तुती केली आहे. फ्रेंच रिव्हेरामधील या व्हिडिओत आलिया तिच्या कान्समधील अनुभवाबद्दल बोलताना ती म्हणाली, सध्या सगळे मोबाइलवर रेड कार्पेट लूक पाहत आहेत. मी ऐश्वर्या राय यांना त्यांच्या शानदार अंदाजात रेड कार्पेटवर चालताना आणि जागतिक व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करताना पाहत मोठी झाले. हा माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी अनुभव होता. येथे असणे खूप छान वाटते, जणू काही क्षण पाहून मी थक्क झाले. या व्हिडिओनंतर चाहत्यांनी आलियाचे कौतुक केले. एका सोशल मीडिया युजरने लिहिले, आलिया नेहमीच इतर अभिनेत्रींचे कौतुक करते आणि त्यांचे नाव घेते. ही तिची सवय कौतुकास्पद आहे. दुसऱ्या युजरने म्हटले, आलिया इतर अभिनेत्रींबद्दल नेहमी चांगले बोलते, ही गोष्ट मला खूप आवडते. आलिया अलीकडेच 'जिगरा' चित्रपटात दिसली, जो बॉक्स ऑफिसवर फारसा यशस्वी ठरला नाही. ती लवकरच 'अल्फा' आणि संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

# धनश्रीने चहलबरोबरच्या चर्चांवर सोडलं मौन



**भा**रताचा क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांचा घटस्फोट झाला असून दोघेही आता विभक्त झाले आहेत. २२ डिसेंबर २०२० रोजी युजवेंद्र आणि धनश्री लग्नाच्या बेडीत अडकले होते. पण २०२३ मध्ये धनश्री- चहलच्या नात्यात तेढ निर्माण झाल्याचं समोर आलं. अखेर २० मार्चला दोघांच्या संमतीने त्यांचं नातं संपुष्टात आलं. घटस्फोट घेतल्यानंतर धनश्री तिच्या करिअरवर लक्ष केंद्रित करताना दिसत आहे. अशातच तिने घटस्फोट घेतल्यानंतरच्या परिस्थितीवर नुकत्याच एका मुलाखतीत तिची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. एका मुलाखतीत धनश्रीने घटस्फोट घेतल्यानंतरच्या टीका व ट्रोलिंगबद्दल तिचं मत व्यक्त केलं आहे. याबद्दल धनश्री म्हणाली, नकारात्मकता आणि सोशल मीडियावरील टीका मला कधीही त्रास देत नाहीत. मी एक मेहनती व्यक्ती आहे. यापुढे तिने सांगितलं की, या काळात मी स्वत:वरील प्रेम, शिस्त, व्यायाम आणि चांगलं अन्न यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी माझी जीवनशैली पूर्णपणे बदलली. मी माझ्यावर प्रेम करणार्या आणि माझा आदर करणाऱ्या लोकांमध्ये राहते. यानंतर तिने मी ज्या आव्हानांना तोंड दिले आहे; त्यामुळे मला स्वत:ला माझ्या आयुष्यात पुढे जाण्यास मदत झाल्याचंही म्हटलं. याबद्दल ती म्हणाली, कठीण काळ येतो. परंतू, कलेबद्दलची आवड मला खंबीर राहण्यास मदत करते. यापुढे धनश्री म्हणाली, मी शिकलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे स्वावलंबनाचे महत्त्व. माझ्या पालकांनी मला नेहमीच खंबीर मुलगी म्हणून वाढवलं आहे. मला माझ्याबद्दलचे कोणतेही गैरसमज स्पष्ट करण्यात मला आता रस नाही. कारण त्यामुळे फक्त आणि फक्त अधिक तर्क-वितर्क काढले जातात. हे तर्क-वितर्क माझ्या कामाबद्दलचे असावेत असं वाटतं. सध्या मी वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

# अथिया शेट्टीने बॉलीवूड सोडले



**बॉ**लीवूड अभिनेते सुनील शेट्टींची मुलगी अथिया शेट्टीला दोन महिन्यांपूर्वी कन्यारत्न प्राप्त झालं. त्यानंतर आता अभिनेत्रीबद्दल आणखी एक बातमी समोर येत आहे, ती म्हणजे अथियाने बॉलीवूड सोडण्याचा निर्णय घेतला आहे. याबद्दल अथियाचे वडील सुनील शेट्टी यांनी स्वत: खुलासा केला आहे. सुनील शेट्टी यांनी आपल्या अभिनयाद्वारे इंडस्ट्रीत स्वत:चं अढळ स्थान निर्माण केलं आहे. आजवर त्यांनी अनेक हिट चित्रपटल दिले आहेत. वडिलांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांची दोन्ही मुलं म्हणजेच अथिया आणि अहान यांनीसुद्धा या क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. मात्र आई झाल्यानंतर वयाच्या ३२ व्या वर्षी अथियाने बॉलीवूड सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सुनील शेट्टींनी स्वत: याबद्दल सांगितलं. यावेळी त्यांनी या क्षेत्रात मुलगी अथियाला तिचे करिअर सुरू ठेवण्यात रस नाही. या सगळ्यापासून ती दूर राहण्यास तिला सोयीस्कर वाटतं. तसंच अभिनय क्षेत्रातून माघार घेण्याचा निर्णय तिने स्वत:हून घेतल्याचंही सुनील शेट्टींनी सांगितलं. सुनील शेट्टींच्या मते, अथियाला तिच्या शेवटच्या चित्रपटानंतर काही चित्रपटांबद्दल विचारणा झाली. परंतु तिने कोणताही चित्रपट स्वीकारला नाही. याबद्दल सुनील शेट्टी म्हणाले, मुलगी अथियाने मला सांगितले, 'बाबा, मला यापुढे चित्रपटांत काम करायचं नाही.' तिच्या या निर्णयाचा मी आदर करतो.

# नव्वदीचे जादुई दशक

**ले**खक सचिन कुंडलकर यांचे पुस्तक नुकतेच वाचण्यात आले. सचिन कुंडलकर यांनी आतापर्यंत नऊ चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. त्यांच्या निरोप आणि गंध या चित्रपटांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाले आहेत. अशा चिंतनशील दिग्दर्शकाचे लेखांचे संग्रह म्हणजे पुस्तक आहे.

पहिल्याच १९९० या लेखात सूर्यकांत यांची आठवण लेखक सांगतात. सूर्यकांत मेकअप झाल्यावर दिग्दर्शक आणि कॅमेरामनच्या पाया पडायचे. सूर्यकांत म्हणायचे तुम्ही भले लहान असाल पण भालजी पेंढारकर यांनी आम्हाला लावलेली ही शिस्त आहे.

प्रत्येक माणूस हा एका दशकामुळे घडवला जातो तेच दशक त्या माणसाचे पोषण करते आणि काही काळाने तेच दशक त्या माणसाची मर्यादा बनते, आणि त्याची जुनी जाणीव बनवते. नुकतीच श्रीदेवी संपून गेली तेव्हा माझे काहीतरी संपल्यासारखा उदास झालो. यात माझ्या नव्वदितल्या दशकाची जाणीव आहे. श्रीदेवी हे माझ्यासाठी नव्वदीच्या दशकाचे माझ्यासाठी बोध चिन्ह आहे. भारताने नालॉग काळातून डिजिटल काळात प्रवेश केला. हा फक्त तांत्रिक प्रवास घडला नाही मानसिक प्रवासही झाला.

**इस्तंबूल डायरी...**

हे अनोळखी लोकांशी बोलणारे शहर आहे. जलालुद्दीन रूमी लेखकाचा आवडता पर्शियन कवी. We have a huge barrel of wine, But no cups. That's fine with us. Every




morning We glow in the evening We glow again. They say there is no future for us. They are Right. Which is fine with us. Jallaludin Rumi.

इस्तंबूल हे शहर आशिया आणि यूरोप या दोन खंडांमध्ये विभागले गेले आहे. निम्मे युरोपमध्ये निम्मे आशियामध्ये.

आपण पश्चिमात्य आहोत की पौर्वात्य या सतत संदर्भात जगणारे शहर. या संभ्रमातून फार सुंदर स्वरूप या शहराने घेतले आहे. ते जगात इतर कोणत्याही शहराकडे नाही. एक त्या माणसाचे स्वयंपाक घर...या लेखात लेखक विजय तेंडुलकर यांच्या आठवणी सांगतात. विजय तेंडुलकर मला नेहमी म्हणायचे की, लिहिणे म्हणजे लिहून काढणे नाही. The act of writing ही आपल्या मनात सतत चालू असते. आपण टेबलापाशी प्रत्यक्ष लिहितो तेव्हा फक्त उतरवून काढत असतो. मी स्वयंपाक करत असताना बहुतांशी लिखाण मनामध्ये आपोआप करत असतो, असे लेखक म्हणतात.

मनाच्या पोकळीतले संगीत... या लेखात लेखक म्हणतात... माझ्या साध्यासुध्या स्वप्नांना गुलजारांनी मोकळ्या खिडक्या दिल्या. मला लिखित शब्दांचे महत्त्व सगळ्यात आधी गाण्यांमधून गुलजारांनी शिकवले. माझ्या हेडफोनला लागलेल्या घामात ते उतरत असतात.

माझा खोल खोल अंधारा खाजगी पणा मी सजवायला शिकलो. तिथे झुंबरे पेटवून आयुष्य सोपे करायला शिकलो. याला गुलजार कारणीभूत ठरले. त्यांनी आपल्यासाठी लिहून ठेवलेली अनेक सुंदर गाणी आणि कविता. मराठी साहित्याचे जग.. महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ आणि बंगालमध्ये लेखक होणे एकच वेळी फार सोपे आणि एकाच वेळी महाकठीण आहे. त्यामुळे एकाच वेळी या राज्यांमध्ये खूप जास्त लेखक असतात. त्याचवेळी खरे कसदार लेखक फार कमी असतात, अशी परिस्थिती. इंग्रजी भाषेमध्ये लिखाण आणि साहित्य यातली जी सीमारेषा मानतात ती मराठीमध्ये संपून गेली आहे. प्रकाशित होणे सोपे होऊन बसले आहे. सातत्य, संशोधन आणि परिश्रमपूर्वक सावकाश केल्या गेलेल्या लेखनाचा मराठीतला काळ जवळजवळ संपुष्टात आला आहे. माझ्या संपूर्ण जाणिवेचे पोषण पुस्तकांनी केले. माझे मन अजूनही वाचणारे मन आहे पाहणारे मन नाही.

माझ्यापेक्षा जी लहान वयाची पिढी आहे त्या पिढीचा ज्ञानाचा व अनुभवाचा मार्ग 'पाहणे'हा आहे तसा माझा वाचणे आहे. कारण मी १९९० च्या आधीच्या नालॉग काळात जन्मलेला मुलगा आहे. असे म्हणतात की 'येरे घना येरे घना' ही कविता आरती प्रभूंनी आपल्या कविता आता प्रकाशित होणार, लोक त्या वाचणार त्या आपल्या उरणार नाही या संकोचाने केली.

'फुले माझी आळूमाळू...वारा बघे चुरगळू... नको नको म्हणताना... गंध गेला रानावना...' अशा साहित्य संवादासह अनेक छायाचित्रे पुस्तकात आहेत. थोडीशी गूढ वाटतील अशीच ती आहे. एखाद्या दिग्दर्शकाची दृष्टी कशी तयार होते व पोती तयार होण्यामध्ये किती घटक कारणीभूत होत असतात हे नकळतपणे लेखकाने पुस्तकात मांडले आहे. नव्वदीतील पिढी हे पुस्तक आवर्जून वाचेल यात शंकाच नाही.

**श्रीधर खेडगीकर**
(प्रिसिजन वाचन अभियान, सोलापूर)

# डॉ. कलाम यांचा जीवनप्रवास रुपेरी पडद्यावर!

भारताचे मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे देशाचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची घोषणा कान्स चित्रपट महोत्सवात करण्यात आली आहे. यामुळे त्यांचा जीवनप्रवास रुपेरी पडद्यावर पाहिला मिळणार आहे. या चित्रपटाचे नाव कलाम असे असून दिग्दर्शक ओम राऊत या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. तर दाक्षिणात्य अभिनेता धनुष्य चित्रपटात मुख्य भूमिका म्हणजेच अब्दुल कलाम यांच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी फ्रान्समध्ये सुरू असलेल्या कान्स चित्रपट महोत्सवात कलाम चित्रपटाची घोषणा केली आहे.

ओम राऊत आणि धनुष या चित्रपटावर चर्चा करण्यासाठी भेटले होते. तेव्हा त्यांना जाणवले की ते एकत्र त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा चित्रपट बनवत आहेत आणि तो देशाचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर हा चित्रपट आधारित असणार आहे. चित्रपटाचे निर्माते अभिषेक अग्रवाल म्हणाले की, 'डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन मोठ्या पडद्यावर आणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.' हा आमच्यासाठी भावनिक क्षण आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार ओम राऊत आणि धनुष यांच्यासोबत काम करण्याचा मला सन्मान मिळावा याचा मनस्वी आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म झाला. ते पाच वर्ष भारताचे राष्ट्रपती राहिले होते. रामेश्वरमपासून ते राष्ट्रपती भवनापर्यंत ते कसे पोहचेले. या प्रवास अनेक अडथळ्यांचा सामना त्यांना करावा लागला होता. यामुळे डॉ. अब्दुल कलाम यांचे जीवन लोकांसाठी एक आदर्श मानले जाते. मिसाईल मॅन म्हणूनही त्यांना ओळखले जाते. त्यांचा जीनवप्रवास उलघडून सांगणारी अनेक पुस्तक आणि चित्रपट आहेत. मात्र, कलाम या चित्रपटात अब्दुल कलाम यांच्या जीनवातील कोणते प्रसंग दाखविण्यात येणार याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.



# हर्षवर्धन राणेच्या 'दीवानियत'च्या नावात बदल

सिटाडेल या गाजलेल्या वेबमालिकेची भारतीय आवृत्ती कशी असेल? कलाकारांचे चित्रपट गाजले की त्यांचा चाहता वर्गही वाढतो. चाहत्यांचं भरभरून प्रेम मिळावं असं प्रत्येक कालाकाराला वाटत असतं. असाच एक चित्रपट म्हणजे 'सनम तेरी कसम'. या सिनेमाला रि-रिलीजनंतर बॉक्स ऑफिसवर मिळालेल्या यशानंतर हर्षवर्धन राणे पुन्हा एकदा चर्चेत आला. लवकरच तो एका रोमॅन्टिक चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात तो पंजाब दी कुडी सोनम बाजवा सोबत पडद्यावर रोमान्स करताना दिसणार आहे. अलिकडेच निर्मात्यांनी त्याच्या या आगामी चित्रपट 'दीवानियत'ची घोषणा केली होती. त्यात आता चित्रपटाच्या रिलीज डेटवरुनही पडदा हटविण्यात आला आहे. दरम्यान, सोशल मीडियावर नुकतंच या चित्रपटाचं नवीन पोस्टर समोर आलं आहे. या नव्या पोस्टसोबत हर्षवर्धनच्या सिनेमाच्या नावातही थोडाफार बदल करण्यात आला आहे. त्यामुळे या पोस्टरने सिनेरसिकांचं लक्ष वेधलं आहे. हर्षवर्धन राणेच्या या आगामी चित्रपटाचं नाव 'एक दीवाने की दीवानियत' असं असणार आहे. 'एक दीवाने की दीवानियत' या रोमँटिक ड्रामा असलेल्या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये पाहायला मिळतंय की, सोनम बाजवा हातात लाईटर घेऊन हर्षवर्धनने धरलेले गुलाबाचे फूल पेटवत आहे. एकीकडे सोनमही भावुक झाल्याचं दिसतंय तर हर्षवर्धनच्या डोळ्यातून रक्ताचे अश्रू येत आहेत. हर्षवर्धन राणेने सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलंय की, २ ऑक्टोबर २०२५... गांधी जयंती आणि दसऱ्याला थिएटरमध्ये प्रे नफरत आणि पाहा 'एक दीवाने की दीवानियत'... चित्रपटाचं हे पोस्टर पाहून प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. दिग्दर्शक मिलाप जावेरी 'दीवानियत' या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. तर मुश्ताक शेख यांनी चित्रपटाचं कथानक लिहिलं आहे. येत्या २ ऑक्टोबरला म्हणजेच गांधी जयंतीच्या पार्श्वभूमीवर हा चित्रपट प्रदर्शित केला जाणार आहे.



# तारा सुतारिया पुन्हा प्रेमात!

आपल्या सौंदर्याने सर्वांना घायाळ करणारी अभिनेत्री म्हणजे तारा सुतारिया. काही दिवसांपुर्वीच तिचा एक्स बॉयफ्रेंड आदर जैन हा लग्नबंधनात अडकला. करीना कपूरचा तो आतेभाऊ आहे. त्यानं आपल्या लग्नात दिलेल्या भाषणात पत्नी अलेखाशी लग्न करण्यापुर्वी ४ वर्ष आपण टाईमपास केल्याचं वक्तव्य केलं. यानंतर त्याच्यावर टीकेची झोड उठली होती. कारण, त्याचा रोख हा अभिनेत्री तारा सुतारियाकडे होता. तारासोबत तो ४ वर्ष रिलेशनशिपमध्ये होता. आता तारा आपल्या आयुष्यात पुढे गेल्याचं पाहायला मिळतंय. ती पुन्हा एकदा प्रेमात पडली असल्याची चर्चा आहे. तारा सुतारियाची लव्ह लाइफ पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली आहे. अलीकडेच तारा आणि वीर एका फॅशन वीकमध्ये एकत्र दिसले होते. विशेष म्हणजे या शोमध्ये ते दोघंही शोस्टॉपर होते. त्यानंतर त्यांना एकत्र डिनर डेटवरही अनेक वेळा पाहिलं गेलं आहे. त्यामुळे ही चर्चाच अधिक वाढली आहे. मात्र, अद्याप या नात्याची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. वीर हा एका प्रतिष्ठित राजकीय कुटुंबातून येतो. तो महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू आहे. वीर हा स्मृती शिंदे यांचा मुलगा आहे.तो सध्या अभिनय क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

नुकतंच त्याने अक्षय कुमारसोबत 'स्काय फोर्स' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्याआधी वीरचं नाव सारा अली खान आणि मानुषी छिल्लरसोबत जोडलं गेलं होतं. तर ताराचं नाव याआधी अभिनेता अरुणोदय सिंहसोबतही जोडलं गेलं होतं. मात्र, एका मुलाखतीत तिनं स्वतःला सिंगल असल्याचं सांगितलं होतं आणि अरुणोदय हा तिचा केवळ चांगला मित्र असल्याचं स्पष्ट केलं होतं.

# रश्मिकाकडून 'थामा'च्या चित्रिकरणाला प्रारंभ



अभिनेत्री रश्मिका मंदानाने आयुष्मान खुरानासोबतचा हॉरर कॉमेडी चित्रपट 'थामा'चे चित्रिकरण सुरू केले आहे. पुढील काही दिवसांपर्यंत रात्री चित्रिकरण करावे लागणार आहे. याचमुळे केवळ चंद्र, कॅमेऱ्याचा प्रकाश आणि तार्यांविषयीच पोस्ट आणि कहाण्या पहायला मिळतील असे रश्मिकाने चाहत्यांना उद्देशून म्हटले आहे. थामा या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य सरपोतदार करत आहे. रश्मिकाने आदित्यचे छायाचित्र पोस्ट करत 'माझा दिग्दर्शक दरवेळी नाइट शूट करवितो, आइस बकेट, माझ्या जीवनाची कहाणी' अशी कॅप्शन जोडली आहे.

थामा हा चित्रपट हॉरर-कॉमेडी असण्यासोबत रोमँटिक देखील असेल. चित्रपटाची कहाणी एका अपूर्ण प्रेमकहाणीच्या अवतीभवती घुटमळणारी असेल. आयुष्मानसोबत रश्मिका यात महत्त्वाची भूमिका साकारत आहे. चित्रपटात नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावल देखील दिसून येणार आहेत. हा चित्रपट चालू वर्षात दिवाळीच्या आसपास प्रदर्शित होणार आहे. दिनेश विजन आणि अमर कौशिक यांच्याकडून या चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. या चित्रपटाची कहाणी नीरेन भट्ट, सुरेश मॅथ्यू आणि अरुण फुलारा यांनी लिहिली आहे.

## 'स्पिरिट'मध्ये रुक्मिणी

सुपस्टार प्रभास आणि दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांचा बहुप्रतिक्षित 'स्पिरिट' हा ॲक्शनपट सध्या चर्चेत आहे. यामध्ये प्रभाससोबत मुख्य अभिनेत्री म्हणून दीपिका पादुकोणला ऑफर देण्यात आली होती. पण, आता संदीप रेड्डी वांगा यांनी दीपिकाला बाहेर काढलं आहे. दीपिकाने खूप जास्त मानधन मागितल्याने संदीप रेड्डी वांगा नाराज होते. तसंच तिच्या काही अटीही होत्या. तिच्या अनप्रोफेशनल वागण्यामुळेच वांगा यांनी तिला सिनेमातून बाहेर काढलं आहे. दीपिकाची जागा आता एका दुसऱ्या अभिनेत्रीनं घेतली आहे. संदीप रेड्डी वांगा हे अभिनेत्री रुक्मिणी वसंत हिली दीपिकाच्या जागी कास्ट करण्याचा विचारात आहेत. रुक्मिणी ही एक उत्तम अभिनेत्री आहे. आपल्या मेहनतीच्या जोरावर तिनं स्वतःची ओळख निर्माण केली आहे. दरम्यान, सिनेमात रुक्मिणीच्या कास्टिंगबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. रुक्मिणीचा जन्म १० डिसेंबर १९९६ रोजी बंगळुरूमध्ये झाला. तिचे वडील कर्नल वसंत वेणुगोपाल हे जम्मू-काश्मीरमधील उरी येथे देशासाठी लढताना शहीद झाले होते. त्यांना मरणोत्तर अशोक चक्राने सन्मानित करण्यात आले होते. रुक्मिणीच्या आई या भरतनाट्यम नृत्यांगना आहेत. त्यांनी सैनिकांच्या कुटुंबीयांसाठी एक स्वयंसेवी संस्था स्थापन केली आहे. रुक्मिणीने आपले शिक्षण आर्मी स्कूल, एअर फोर्स आणि सेंटर फॉर लर्निंगमध्ये पूर्ण केले आहे. तर अभिनयाचे धडे तिनं लंडनमधून घेतले आहे. सध्या ती २८ वर्षांची असून प्रभासपेक्षा १७ वर्षांनी लहान आहे. तिने काही तमिळ आणि तेलगू चित्रपटांमध्ये कौतुकास्पद काम केले आहे.




# तमिळ चित्रपटसृष्टीत रवीना २४ वर्षांनी परतली

बॉलिवूडची 'मस्त-मस्त गर्ल' म्हणजेच रवीना टंडन ही नवदच्या दशकातील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे जी अजूनही सक्रिय आहे आणि चित्रपट करत आहे. आता रवीना २४ वर्षांनी तमिळ चित्रपटसृष्टीत पुनरागमन करणार आहे. ती दिग्दर्शक जोशुआ सेथुरामन यांच्या नवीन चित्रपटात दिसणार आहे. आता दिग्दर्शकाने रवीनाच्या चित्रपटात समावेशाबद्दल बोलले आहे. अलिकडेच, रवीना टंडनचा 'लॉयर' या तमिळ चित्रपटात समावेश जाहीर करण्यात आला. या चित्रपटात तमिळ स्टार विजय अँटनी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. आता, चित्रपटाचे दिग्दर्शक जोशुआ सेथुरामन यांनी रवीनाला चित्रपटात कास्ट करण्याबद्दल खुलासा केला आहे. यावेळी बोलताना दिग्दर्शक म्हणाले, माझे काही मित्र बॉलिवूडमध्ये काम करत आहेत, ज्यांच्या माध्यमातून मी रवीनाशी संपर्क साधला. मी तिला सांगितले की जेव्हा ती माझा पहिला चित्रपट 'जेंटलवूमन' पाहेल तेव्हा तिला माझ्या कामाची कल्पना येईल. तिने हा चित्रपट पाहिल्यानंतर, मी लगेच तिला या चित्रपटाची कथा सांगितली आणि तिने त्यात रस दाखवला. 'लॉयर' चित्रपटाद्वारे, रवीना टंडन जवळजवळ २४ वर्षांनी तमिळ चित्रपटसृष्टीत परतत आहे. २००१ मध्ये आलेल्या 'आलावंधन' या चित्रपटात ती शेवटची दिसली होती. सुरेश कृष्णा दिग्दर्शित या चित्रपटात कमल हासन, मनीषा कोइराला, अनु हसन, किटू गिडवानी आणि सरथ बाबू यांच्या प्रमुख भूमिका आहेत. बॉलिवूड व्यतिरिक्त, रवीन टंडनने त्याच्या कारकिर्दीत तमिळ आणि तेलगू चित्रपटांमध्येही काम केले आहे. दक्षिण चित्रपटांमधील तिचा सर्वात मोठा हिट चित्रपट म्हणजे यशचा कन्नड चित्रपट 'केजीएफ २'. यामध्ये त्याच्यासोबत संजय दत्तही दिसला होता. या चित्रपटातील रवीनाच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. रवीना टंडनच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, या तमिळ चित्रपटाव्यतिरिक्त, ती बॉलिवूडच्या मल्टीस्टारर चित्रपट 'हाऊसफुल ५' गल्लीयों में' मध्ये देखील आहे.



# मराठी सिनेसृष्टी आता मला बोलवत नाही



अभिनेत्री पल्लवी जोशी अनेक वर्ष इंडस्ट्रीत आहे. 'द काश्मीर फाईल्स' गाजवल्यानंतर आता ती 'द बंगाल फाईल्स' मधून भेटीला येणार आहे. त्यापूर्वी ती 'तन्वी द ग्रेट' सिनेमात दिसली ज्याचं नुकतंच कान्स फिल्म फेस्टिव्हलध्ये प्रीमियर पार पडलं. पल्लवी मराठी इंडस्ट्रीतही तितकीच सक्रीय होती. सारेगमप या संगीत रिएलिटी शोचं तिने सूत्रसंचालन केलं. 'ग्रहण' या मालिकेतही ती झळकली. मात्र पुन्हा मराठीत का दिसली नाहीस? असा प्रश्न तिला विचारण्यात आला. यावर तिने उत्तर दिलं आहे. पल्लवी जोशी मराठीतलं सर्वांच्या परिचयाचं नाव आहे. मात्र, सध्या ती हिंदी इंडस्ट्रीतच जास्त रमली आहे असंच अनेकांना वाटतंय. याच संदर्भात दिलेल्या एका मुलाखतीत पल्लवी जोशी म्हणाली, मराठी इंडस्ट्री मला बोलवतच नाही. मी हिंदीतच असते अशीच त्यांची समजूत झाली आहे. मी मराठी सिनेमे आवर्जुन बघत असते. ही भूमिका मी चांगली करु शकले असते असंही मला अनेकदा वाटतं. मला मराठीत काम करायला आवडतंच. ती पुढे म्हणाली, हिंदीत मी आणि माझा नवरा विवेक एकत्र काम करतो. पण म्हणून आम्ही स्वतंत्र काम करत नाही असं मुळीच नाही. त्यालाही स्वतंत्र कामाची विचारणा होत असते. हा फक्त बायकोसोबतच काम करतो असा त्याच्याबाबतीत कोणी समज करु घेतलेला नाही. पण माझ्याबाबतीतच तो करुन घेतला आहे. मी एक निर्मातीसुद्धा आहे हे सगळे सोयीस्कररित्या विसरतात. मी फक्त नवर्यासोबतच काम करते असं नाहीए. पल्लवी जोशीने मराठी, हिंदी, गुजराती आणि दाक्षिणात्य सिनेमांमध्येही काम केलं आहे. 'असंभव', 'ग्रहण', 'अल्पविराम' अशा मराठी मालिका केल्या आहेत. 'द काश्मीर फाईल्स', 'द ताश्कंत फाईल्स' साठी तिला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे.

# अमृता सुभाषला करावा लागला वर्णभेदाचा सामना

अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आणि सिनेसृष्टीत स्थान निर्माण करणारी हरहुन्नरी अभिनेत्री म्हणजे अमृता सुभाष. अनेक गाजलेल्या मालिका, सिनेमा, नाटकांमध्ये काम करून अमृताने केवळ मराठीच नव्हे तर हिंदी कलाविश्वातही आपली ओळख बनवली. तिला लहानपणापासूनच कलेची आवड होती. मात्र, बालपणीच अमृता सुभाषला वर्णभेदाचा सामना करावा लागला होता. अमृताने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने शाळेतला वर्णभेदाचा प्रसंग सांगितला. गोरी दिसत नाही म्हणून अमृता शाळेतील शिक्षकांनी डान्समध्ये भाग घेऊ दिला नव्हता. हे सांगताना ती म्हणाली, माझ्या एका लहानपणीच्या बाईंनी मला सांगितलं होतं की सुंदर मुलींना मी डान्समध्ये घेणार आहे. तेव्हा मी त्यांना म्हणाले होते की माझा डान्स बघा. तेव्हा त्या मला म्हणाल्या की नाही तू काही गोरी घारी नाहीस. त्यामुळे तू डान्स करू नकोस. मला त्या बाईंनी डान्समध्ये घेतलं नाही. तेव्हा माझ्या मनात विचार आला की आपण सावळे आहोत म्हणजे आपल्याला आपल्या आवडीच्या गोष्टी करायला मिळणार नाहीत. त्या बाईंनी त्यांच्या नकळत हा विचार माझ्या मनात पेरला. पण, त्याला खतपाणी घालायचंय, त्याचं झाड उगवू द्यायचंय की ते मनावर घ्यायचं नाही, हे माझ्या हातात आहे. मी त्या गोष्टीला असंच जावू देऊ शकते. आणि म्हणू शकते की नाही मला डान्स करायला आवडतो आणि मला संधी मिळू शकते. हे दोन्ही रस्ते आपल्यासमोर दर दिवशी उभे असतात. आणि आपल्याला त्यातली निवड करायची असते. ते स्वातंत्र्यही आपल्याकडे असतं पण शेवटी आपण माणूस आहोत. त्यामुळे कधी कधी आपण वीक होऊ शकतो, असंही अमृता पुढे म्हणाली.

# 'कप बशी'त पूजा सावंत झळकणार



अभिनेत्री पूजा सावंतचा नवाकोरा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'कप बशी' या चित्रपटात पूजासह ऋषी मनोहर पाहायला मिळणार आहे. पहिल्यांदाच ही जोडी एकत्र झळकणार आहे. सध्या मुंबईमध्ये या चित्रपटाचं चित्रिकरण सुरू आहे.

'कप बशी' या चित्रपटाची निर्मिती कल्पक सदानंद जोशी करणार आहेत. त्यांचं चित्रपटसृष्टीशी जुने नाते असून त्यांचे वडील सदानंद जोशी यांनी १९९६ साली प्रदर्शित झालेल्या 'पुत्रवती' या चित्रपटासाठी कथा, पटकथा, गीतलेखन आणि निर्मिती अशा सर्वच बाजूंवर काम केलं होतं. या चित्रपटाला राष्ट्रीय, राज्यस्तरीय १४ पुरस्कारांनी गौरवला गेला होता. तर कन्यादान, नकुशी, शुभमंगल ऑनलाइन, पुढचं पाऊल अशा गाजलेल्या मालिकांचे दिग्दर्शक वैभव चिंचाळकर या चित्रपटातून नवीन कथा प्रेक्षकांसाठी घेऊन येणार आहे.

या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेत्री निर्मिती सावंत देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यामुळे उत्तम अभिनय, मनोरंजनाचा आनंद या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळणार आहे. मात्र अद्याप या चित्रपटाच्या रिलीज डेटबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. पूजा सावंतने अनेक मराठी, हिंदी चित्रपटांत उत्तम अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तर ऋषि मनोहरनं टीव्ही मालिका, नाटक, चित्रपटांतून प्रेक्षकांच्या घरोघरी पोहोचला आहे. पूजा सावंत आणि ऋषी मनोहर यांची जोडीला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत.



# संजय कपूरच्या लेकीचे बॉलीवूडमध्ये पदार्पण!



नवदच्या दशकातील लोकप्रिय अभिनेते, अनिल कपूर व बोनी कपूर यांचे भाऊ संजय कपूर आपल्या सुपरहिट चित्रपटांमध्ये ओळखले जातात. अलीकडच्या काळात त्यांनी 'मिशन मंगल,' 'ब्लडी डॅडी,' 'मेरी ख्रिसमस,' 'लस्ट स्टोरीज' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये व सीरिजमध्ये काम केलं आहे. कपूर कुटुंबातील सोनम, जान्हवी, खुशी व अर्जुन कपूरनंतर आता संजय कपूर यांची मुलगी शनाया कपूर बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. शनायाच्या पहिल्या चित्रपटाचं नाव 'आँखों की गुस्ताखियां' असं आहे. 'आँखों की गुस्ताखियां' या चित्रपटात शनायबरोबर अभिनेता विक्रांत मॅसी मुख्य भूमिकेत झळकणार आहे. 'आँखों की गुस्ताखियां' हा चित्रपट ११ जुलै २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. शनायाचा हा पहिलाच चित्रपट आहे. त्यामुळे ती भारावली आहे. पण मला तुझ्याबरोबर काम करताना खूप मजा आली आणि यापुढे ही तुझ्याबरोबर काम करायला आवडेल, असं विक्रांत शनायाला म्हणाला. 'आँखों की गुस्ताखियां' हा एक रोमँटिक चित्रपट असून विक्रांत मॅसी व शनाया कपूर ही फ्रेश जोडी यामधून पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, शनायाबद्दल बोलायचे झालं तर ती अभिनेते अनिल कपूर यांची पुतणी आहे. तर सोनम कपूर, जान्हवी कपूर, खूशी कपूर यांच्या पाठोपाठ आता शनायाही अभिनयक्षेत्रात पदार्पण करत आहे. शनायाचा हा पहिला सिनेमा असला तरी यापूर्वी तिने म्युझिक व्हिडीओमध्ये काम केलं होतं.

# 'ओह माय गॉड'चा तिसरा भाग येणार?




बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारची सध्या हिंदी सिनेसृष्टीत जोरदार चर्चा आहे. २०२५ या वर्षात अभिनेता नवनवीन चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अलिकडेच अभिनेत्याची प्रमुख भूमिका असलेला 'केसरी-२' या सिनेमाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. यानंतर एकामागोमाग त्याचे चित्रपट प्रदर्शनास सज्ज झाले आहेत. त्यात आता अक्षय कुमारचा २०१२ साली प्रदर्शित झालेला 'ओह माय गॉड' चित्रपटाचा तिसरा भाग येणार असल्याची अपटेड समोर येत आहे. 'ओएमजी- ३' च्या पटकथेबाबत चित्रपट निर्माते अमित राय आणि अक्षय कुमार यांच्यात चर्चा झाली आहे. अशी माहिती मिळते आहे.

दरम्यान, २०१२ मध्ये 'ओह माय गॉड' फ्रँचायझी लाँच झाली. पहिल्या भागात अक्षय कुमारने भगवान श्रीकृष्णाची भूमिका साकारली होती, तर २०२२ मध्ये 'ओएमजी २' मध्ये तो भगवान शिवशंकराच्या अवतारात दिसला होता. दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरले आणि आता त्याच्या तिसऱ्या भागावरही काम सुरू झाले आहे. निर्माते अमित राय आणि अक्षय कुमार यांच्यामध्ये ओएमजी-३ बद्दल चर्चा सुरु असल्याचं म्हटलं जात आहे. नुकतंच अक्षय कुमारने भूत बंगला चित्रपटाचं शूट पूर्ण केलं आहे. त्यामुळे लवकरच तो ओएमजी-३ च्या शूटिंगला सरुवात करु शकतो, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. येत्या २०२६ पर्यंत हा चित्रपट प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. परंतु स्क्रीप्ट पूर्ण झाल्यानंतर या चित्रपटाची स्टारकास्ट ही फायनल करण्यात येईल, असंही सांगण्यात येत आहे. दरम्यान, याबाबत चित्रपटांच्या निर्मात्यांनी कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. दरम्यान, अक्षय कुमारच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर अभिनेता सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्टच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. लवकरच त्याचा हाऊलफुल-५ हा चित्रपट रिलीज होणार आहे. त्यासोबत 'भूत बंगला', 'वेलकम टू द जंगल', 'हेरा फेरी-३' तसेच 'जॉली एलएलबी-३' या चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# रजनीकांतच्या 'जेलर-२' मध्ये विद्या



सुपरस्टार रजनीकांत गेली अनेक वर्षे बॉलिवूडसह दाक्षिणात्य सिने इंडस्ट्रीवर अधिराज्य गाजवलं आहे. अभिनेते रजनीकांत यांच्या चित्रपटांची चाहत्यांमध्ये प्रचंड क्रेझ आहे. त्यांचे चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक अक्षरशः काहीही करायला तयार असतात. दरम्यान, रजनीकांत त्यांचा आगामी प्रोजेक्ट जेलर-२ मुळे चर्चेत आले आहेत. 'जेलर २' रिलीजच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रेक्षकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. याच चित्रपटासंदर्भात आता एक महत्वाची अपडेट समोर येत आहे.

रिपोर्टनुसार, जेलर-२ मध्ये बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालनची एन्ट्री झाल्याची माहिती मिळते आहे. 'जेलर २' मध्ये विद्या बालन महत्वाची भूमिका तिच्या साकारणार असल्याचं सांगण्यात येत आहे. त्याचबरोबर या चित्रपटात नागार्जुन आणि बालकृष्ण यांचीही झलक प्रेक्षकांना पाहायला मिळणार असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. परंतु, याबाबत चित्रपटाने निर्माते तसेच विद्या बालनकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या चित्रपटाची निर्मिती सन पिक्चर्स करत आहे आणि संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिलं आहे.

रजनीकांत यांची मुख्य भूमिका असलेल्या 'जेलर' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली होती. सुमारे ६५० कोटी रुपयांची कमाई करून हा चित्रपट एक मोठा ब्लॉकबस्टर ठरला होता. 'जेलर २' मध्ये रजनीकांत प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय त्यांच्यासोबत जॅकी श्रॉफ आणि साउथ सुपरस्टार मोहनलाल झळकणार आहे. 'जेलर २'ची रिलीज डेट जाहीर झाली नसून लवकरच हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

## ‘तिन्ही सांज होता, तुझी याद येते...’

# स्वर लालित्याचे देऊळ ललिता देऊळकर (फडके)

**भा**रतीय चित्रपटाचा श्रीगणेशा मराठी माणसाने केला. अनेक मराठी कलाकारांचे योगदान मूकपटापासूनच होते; नव्हे वर्चस्वही होते. अनेक मराठी स्त्री गायिकांनी हिऱ्यासारखी चमक दाखविली. परंतु या खाणीतील फक्त लताबाई व आशाताई या दोन कोहिनूर हिऱ्यानाच प्रसिद्धी मिळाली. बाकी दुर्लक्षित राहिल्या.

चित्रपटसृष्टीत कालचे हिरे आज दगडाच्या मोलाने दुर्लक्षिले जातात, असे खेदाने पु. ल. देशपांडे म्हणायचे. हमको तुम्हारा ही आसरा, तुम हमारे कौन हो। लब पे तुम्हारा ही नाम है, तुम हमारे कौन हो।। १९४७ सालच्या ‘साजन’ चित्रपटातील हे युगल गीत ललिताबाईंनी मोहम्मद रफींसोबत सी. रामचंद्र यांच्या संगीतात गायिले आहे. त्यांच्या स्वरातील आर्तता स्वरकळेचा दर्जा उजागर करतो. माधुर्य संगीत घराण्याचे अध्वर्यू सी. रामचंद्र यांच्या पठडीत तयार झालेल्या ललिताजींना म्हणूनच तत्कालीन सर्व दिग्गज कलाकारांनी गावून घेतले. मोहम्मद रफी व ललिताबाई ही जोडी युगल गीतांसाठी रसिकांच्या पसंतीस उतरली. ललिताबाईंचा स्वर स्वैरपणे स्वच्छंद उडणाऱ्या कारंजातील पाण्याच्या फवार्यासारखा तर कधी विरहात बुडालेल्या विरहणीसारखा होता.

कदम उठाकर रुक नही सकता, जो भारत का लाल है... देशाला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. देशात नवचैतन्य भरले होते. देशभक्तीची गाणी गाऊन नेत्यांचे कौतुक होत होते. फिल्मीस्तानच्या ‘शहीद’ चित्रपटाचे कथानक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे ब्रिटिश सेन्सरच्या कात्रीतून सुटले होते. ललिताबाईंनी देशभक्तीपर गीत गाऊन जोश पैदा केला. याच चित्रपटात गुलाम हैदर या महान संगीतकारांनी खालच्या पट्टीतील गाणे ललिताजींकडून कोमल स्वरात गाऊन घेतले व ललिताजींचे बहुआयामित्व सिद्ध केले. ‘बचपन की याद धीरे धीरे’ हे ते गाणे होते. त्या काळातील हिंदीतील बहुतेक सर्व संगीतकारांकडे त्या गायल्या. उदा. श्यामसंदर, सी. रामचंद्र, खेमचंद प्रकाश, एस. डी. बर्मन, गुलाम हैदर, हुस्नलाल भगतराम, वसंत देसाई, हंसराज बहेल, स्नेहल भाटकर इ. हिंदी व मराठी अशा सुमारे ३५ चित्रपटांतून त्यांनी १०० च्या वर गाणी गायलीत.

१९२५ सालच्या नवरात्रातील ललिता पंचमी या समृद्ध दिनी म्हणजे २२ सप्टेंबर १९२५ रोजी (पंचांगाप्रमाणे) मुंबईस फ्रेंच ब्रिज जवळील हाजी कासमवाडीत त्यांचा जन्म झाला म्हणून ललिता हे नाव ठेवले. दत्ताजी तायडे व पुरुषोत्तम वालावलकर यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. हरिश्चंद्र चटोपाध्याय यांच्या कानावर तिचे स्वर पडले. ते बॉम्बे टॉकीजशी संबंधित होते. तिच्या हुन्नरी गळ्याचे चीज व्हावे म्हणून तिच्या घरच्यांना मनविले. १४ वर्षांच्या ललिताबाईस चक्क देविका राणीसोबत छोटासा रोल १९३९ च्या ‘दुर्गा’ चित्रपटात मिळाला. नंतर ‘अंगुठी’ चित्रपटात दोन गाणी व कंगन, बंधन चित्रपटात छोट्याशा भूमिका मिळाल्या.

बॉम्बे टॉकीजमध्ये गायला व अभिनय करायला मिळणे ही त्या काळात फार मोठी अभिमानाची गोष्ट होती. १९३९ साली बॉम्बे टॉकीजच्या दिग्गज संगीतकार सरस्वती देवी यांनी तिच्या आवाजातली जादू परखली व तिच्याकडून ‘नवजीवन’ चित्रपटात चक्क बहुश्रुत सोलो साँग गाऊन घेतले. ललिताबाईंनी या संधीचे सोने केले. १९४३ साली बॉम्बे टॉकीजला रामराम ठोकून त्या फिल्मीस्तान संस्थेत आल्या.

दरम्यान, प्रभाकर कुंटे व श्रीधर पार्सेकर आकाशवाणीवर श्रीशंकराच्या चरित्रावर एक ऑपेरा बनवित होते. त्यासाठी ललिताबाई, शांताबाई आपटे, दत्ता डावजेकर, राम मराठे, सडोलिकर व सुधीर फडके हे गायक उपस्थित होते. ते सर्व आपापली गाणी कागद गोलगोल फिरवून गमतीशीर वाचन करीत होते. ते दृश्य पाहून ललिताबाईंना शांता आपटे म्हणाल्या, अगं तिकडे बघ ललिता! ती हिमशिखरे कशी गोल गोल फिरताहेत. ललिताबाईंनी तिकडे दृष्टी फिरवून सुधीर फडके यांना पहिल्यांदाच पाहिले. सुधीर फडके यांचे हिमशिखर तिच्यासाठी कैलास शिखर ठरले व ललिता रूपे अपर्णाला तिचे शिवशंकर गवसले. आकाशवाणीवर ललिताबाई व सुधीर यांचा प्रथम परिचय झाला. १९४६ साली ‘रुक्मिणी स्वयंवर’ व ‘जिवाचा सखा’ या दोन चित्रपटातील काही गाणी सुधीरजींनी ललिताबाईंकडून गाऊन घेतली. त्यानंतर ‘संत जनाबाई’ चित्रपटासाठी ललितांना गाण्यासाठी बोलावले. त्यावेळी ललिताबाईंची आई त्यांच्या सोबत होत्या. त्यांच्याशी सुधीरजींच्या भावाने यांच्या विवाहाबद्दल चर्चा केली. अशारीतीने २९ मे १९४९ रोजी ललिताबाई व सुधीर फडके यांचा विवाह संपन्न झाला. ललिताबाई व मोहम्मद रफी यांची मैत्री होती. संगीतकार श्रीकांत ठाकरे यांनी लिहिलेली मंगलाष्टके मोहम्मद रफींनी या लग्नात स्वतःहून म्हटली व मोठेपण सिद्ध केले. ‘ललिता और सुधीर की जोडी जैसी चांद और चकोर की जोडी’ असे काहीसे शब्द होते. अशारीतीने सूर-संगीताचा जीवन प्रवास सुरू झाला.



**‘मोरे राजा हो, ले चल नदिया के पार मोरी राणी हो, तुम्ही मोरी प्राण आधार ललिताबाई व मोहम्मद रफी यांनी गायलेले १९४८ सालच्या ‘नदिया के पार’ चित्रपटातले हे त्याकाळी गाजलेले अप्रतिम युगल गीत दिलीप कुमार व कामिनी कौशल या मोठ्या स्टारकास्टवर चित्रित झाले होते. त्यावेळी रफी हे नवोदित गायक होते व ललिताबाई अनुभवी सिनेगायिका होत्या. रफी साहेब त्यांना सांभाळून घ्यायला सांगत होते. फडकदार व थोडे उडत्या चालीचे हे गीत असरदार गाऊन ललिताबाईंविषयीत्या काळात नवीन आशा पल्लवित झाल्या. ललिता देऊळकर यांच्याविषयी नवीन पिढीला माहीत नसेल! मराठीतील प्रसिद्ध गायक, संगीतकार व ‘गीतरामायण’ संगीतबद्ध करून गाणारे सुधीर फडके यांच्या त्या अर्धांगिनी होत.**

सुधीरजींच्या चित्रपटात त्यांनी पुष्कळ गाणी म्हटली. रंगू बाजारला जाते हो जाऊ द्या, दही इकाया नेते हो नेऊ द्या... वसंतराव देशपांडेंबरोबर ललिताबाईंनी गायलेल्या या गाण्यात बाजारला जाणाऱ्याा मराठमोळ्या गौळणीचा सूर त्यांना गवसला. अप्रतिम ठसक्यात व गौळणीच्या तोर्यात ही गौळण त्यांनी रंगविली. तसाही ललिताबाईंचा आवाज म्हणजे स्वरमोहिनीचे गारुडच! लंगडा ग बाई लंगडा, नंदाचा कान्हा लंगडा...‘सौभाग्य’ चित्रपटातील हे मराठीतील पौराणिक थाटातले गाणे, गोपींचा कृष्णाला चिडविण्याचा बाझ नटखट थाटात ललिताबाईंनी सुधीरजींच्या संगीतात गाऊन मजा आणली. विवाहानंतर मात्र हिंदी सिनेमात त्या गायल्या नाहीत असे दिसते. त्यामुळे हिंदी गाण्यांचे रसिक एका चांगल्या आवाजाला मुकले, याची खंत जाणवते.

थोडे विषयांतर होते, पण सुधीरजींनी गीतरामायणातली कौसल्केच्या तोंडची गाणी सुरुवातीस ललिताबाईंकडूनच गाऊन घेतली होती. (१) उगा का काळीज माझे उले, (२) नको रे जाऊ रामराया, (३) सावळा ग रामचंद्र. मराठीतील प्रसिद्ध संगीतकार व गायक श्रीधर फडके हे ललिताबाईंचे चिरंजीव आहेत. २५ मे २०१० रोजी मुंबईस ही अद्भुत स्वरांची ज्योत मालवली. इतकी वर्षे हयात असूनही त्यांच्या चित्रपटातील योगदानाची कुणी कुठला पुरस्कार देऊन तर सोडा; साधी दखलही घेतली नाही, याची खंत वाटते.

**रमेश पोफळी**

# मी म्हातारा होणार नाही!



**अ**भिनेता नाना पाटेकर हे त्यांनी साकारलेल्या वेगळ्या धाटणीच्या भूमिकांमुळे ओळखले जातात. आता लवकरच ते ‘हाऊसफुल ५’ मध्ये दिसणार आहेत. नुकताच ‘हाऊसफुल ५’चा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ‘हाऊसफुल ५’च्या ट्रेलरमध्ये नाना पाटेकर एका वेगळ्या भूमिकेत दिसले आहेत. आता मात्र त्यांच्या कोणत्या भूमिकेमुळे नाही तर अभिनेते त्यांच्या वक्तव्यामुळे चर्चेत आहेत.

एका मुलाखतीत त्यांनी मी म्हातारा होणार नाही, असे वक्तव्य केले आहे. नाना पाटेकर म्हणाले, मला माझ्यातली सगळ्यात आवडती गोष्ट कोणती, तर मी म्हातारा होत नाही आणि मी होणारही नाही. माझा एक मित्र जाड झालेला होता. मी शूटिंग करून आलो होतो. मी त्याला म्हणालो की, अरे किती जाड झालास, आयुष्यभर लोक शिव्या देतातच, पण निधनानंतर जेव्हा उचलतात, तेव्हादेखील शिव्या देतील. पुढे ऑपरेशन सिंदूरला सलाम आहे, असे म्हणत नाना पाटेकरांनी ऑपरेशन सिंदूरबाबत भावना व्यक्त केल्या. नाना पाटेकर हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. विविध सामाजिक विषयांवर ते परखड मत व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या वक्तव्यांमुळे ते अनेकदा चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वीच अभिनेते परेश रावल यांनी एका मुलाखतीत नाना पाटेकर हे माझ्यापेक्षाही स्पष्टवक्ते असल्याचे म्हटले होते. तसेच नाना पाटेकरांनी एका निर्मात्याला घरी बोलावून मटण खायला दिले होते. तसेच त्याच्याकडून भांडी स्वच्छ करून घेतल्याचा किस्सादेखील सांगितला होता. अभिनेते नाना पाटेकर यांनी आजपर्यंत मराठीसह हिंदी चित्रपटांतही काम केले आहे. ‘भालू’, ‘आज की आवाज’, ‘परिंदा’, ‘माफीचा साक्षीदार’, ‘अग्नी साक्षी’, ‘तिरंगा’, ‘राजू बन गया जेंटलमन’, ‘युगपुरूष’, ‘वजूद’ अशा अनेक चित्रपटांत त्यांनी काम केले आहे. ‘नटसम्राट’मधील त्यांचा ‘कोणी घर देत का घर’ हा डायलॉग प्रचंड गाजला. तसेच ‘क्रांतिवीर’ चित्रपटातील ‘आ गए मेरी मौत का तमाशा देखने’ हा डायलॉग आजही लोकप्रिय आहे. आता नाना पाटेकरांची ‘हाऊसफुल ५’मधील भूमिका प्रेक्षकांना भुरळ घालणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, रितेश देशमुख, श्रेयस तळपदे हे कलाकारदेखील प्रमुख भूमिकांत दिसणार आहे. आता चित्रपट बॉक्स ऑफिसवर काय करणार हे लवकरच कळेल.



# 'परम-सुंदरी'ची लव्ह स्टोरी सक्सेस होणार?

गेल्या काही महिन्यांपूर्वी जान्हवी कपूर आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या परम सुंदरी चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले होते. यानंतर आता या चित्रपटाचा पहिला टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सुंदर अशा टीझरमधून सिद्धार्थ आणि जान्हवी यांच्या लव्हस्टोरीची झलक पाहायला मिळत आहे. सिद्धार्थ हा उत्तर भारताचा परम बनला आहे, तर जान्हवी दक्षिण भारताची सुंदरी बनली आहे. टीझरच्या सुरुवातीला, सिद्धार्थच्या पात्राची परमची ओळख करून दिली जाते, जो उत्तरेकडील गुरुग्राम शहरात काम करतो. तो एका दक्षिणेकडील सुंदरी अर्थात जान्हवीच्या प्रेमात पडतो. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पुरते वेडे झालेले असतात. दोघेही प्रेमाच्या न्हावेत स्वार झालेले असतानाच त्यांच्या लव्हस्टोरीत एक मोठा ट्विस्ट येतो. यानंतर परिस्थिती थोडी बिकट होते. यामुळे परम आणि सुंदरी यांची लव्हस्टोरी पूर्ण होते की नाही हे चित्रपट पाहिल्यानंतरच समजू शकेल. येत्या २५ जुलै रोजी परम सुंदरी हा चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन तुषार जलोटा यांनी केले आहे, तर दिनेश विजन यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे.'परम सुंदरी' हा चित्रपट उत्तर-दक्षिण लव्हस्टोरी दाखविण्यात आली आहे. याआधी बॉलिवूडमध्ये यावर आधारित चित्रपट तयार करण्यात आले आहेत. २०१३ मध्ये, शाहरुख खान-दीपिकाचा 'चेन्नई एक्सप्रेस' आणि अर्जुन कपूर-आलिया भट्टचा '२ स्टेट्स' या चित्रपटांमध्ये उत्तर-दक्षिण अशा प्रेमकथेवर आधारित चित्रपट आहेत. 'मॅडॉक फिल्म्स' त्यांच्या प्रत्येक चित्रपटात वेगळी कथा आणण्यासाठी ओळखली जाणारी निर्मिती संस्था आहे. यामुळे आता 'परम सुंदरी' चित्रपटात लव्हस्टोरी कशी असणार हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.

# ऑपरेशन 'कुकरी'वर चित्रपट बनणार

बॉलीवूड अभिनेता रणदीप हुड्डा पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एका जबरदस्त भूमिकेत दिसणार आहे. 'जाट' सारख्या सुपरहिट चित्रपटाच्या यशानंतर, रणदीप आता त्याच्या पुढच्या चित्रपटात भारतीय सैन्याच्या सर्वात धाडसी मोहिमेपैकी एकाला प्रत्यक्षात आणणार आहे. अभिनेत्याच्या आगामी




चित्रपटाचे नाव 'ऑपरेशन खुकरी' आहे, जे एक युद्ध नाटक आहे. हा चित्रपट २००० मध्ये पश्चिम आफ्रिकेतील सिएरा लिओनमधील एका खऱ्या लष्करी कारवाईवर आधारित आहे, जिथे भारतीय सैन्याच्या २३३ सैनिकांना बंडखोर सैन्याने ओलीस ठेवले होते. हे अभियान भारतीय सैन्याने केलेल्या सर्वात धोकादायक आणि धाडसी कारवाईंपैकी एक मानले जाते. चित्रपटात, रणदीप हुड्डा १४ व्या मेकॅनाइज्ड इन्फंट्रीचे कंपनी कमांडर असलेले मेजर जनरल राज पाल पुनिया यांची भूमिका साकारणार आहे आणि या मोहिमेचे नेतृत्व करत होते. या प्रकल्पाबद्दल बोलताना रणदीप म्हणाला, 'माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे की मी अशा योद्ध्याची भूमिका साकारत आहे. ज्याने ७५ दिवसांपासून शत्रूमध्ये अडकलेल्या सैनिकांना वाचवलेच नाही तर भारताच्या लष्करी इतिहासात एक सुवर्ण अध्यायही जोडला. 'ऑपरेशन खुकरी'ची कथा एका बेस्टसेलर पुस्तकावर आधारित आहे. या पुस्तकाचे चित्रपट हक्क आता अधिकृतपणे राहुल मित्रा फिल्म्स आणि रणदीप हुडा फिल्म्स यांनी मिळवले आहेत. चित्रपटाच्या पटकथेवर काम जोरात सुरू आहे. 'ऑपरेशन खुकरी' हा भारतीय सैन्याच्या शौर्याची गाथा आहे.

# प्रियांकाला मिळाला नवा चित्रपट



अडीच दशकांपासून चित्रपटसृष्टीत सक्रीय प्रियांका चोप्रा आता ग्लोबल आयकॉन ठरली आहे. बॉलिवूडसमवेत हॉलिवूडमध्ये देखील तिने स्वत:चा ठसा उमटविला आहे. प्रियांका लवकरच भारतीय चित्रपटसृष्टीत ६ वर्षांनी पुनरागमन करणार आहे. एसएसएमबी २९ या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहते तिला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक झाले आहेत. याचदरम्यान तिच्या नव्या चित्रपटाची घोषणा झाली आहे. प्रियांका लवकरच निकोलस स्टोलरच्या आगामी चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटात ती बेवॉच अभिनेता जॅक एफ्रॉनसोबत झळकणार आहे. अमेझॉन एमजीएम स्टुडिओच्या बॅनर अंतर्गत निर्माण होणाऱ्या या चित्रपटात मायकल पेना रेजिना हॉल, जिमी टॅट्रो, बिली आइचनर आणि विल फेरेल देखील महत्त्वाच्या भूमिकेत असेल. प्रियांकाने सोशल मीडियावर पोस्ट करत याची माहिती दिली आहे. निकोलस स्टोलरनेच या चित्रपटाची कहाणी लिहिली असून तोच दिग्दर्शन करणार आहे. याची कहाणी एका गुन्हेगार युवकावर बेतलेली असून तो तुरुंगातून बाहेर पडतो आणि एका अनस्क्रिप्टेड टीव्ही कोर्टरुमला ओलीस ठेवतो. न्यायाधीशाच्या निर्णयामुळे स्वत:चे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचे वाटत असते. न्यायाधीशाची भूमिका विल फेरेल साकारणार आहे. तर गुन्हेगाराच्या भूमिकेत जॅक एफ्रॉन दिसून येईल.